## निशाणी क्र.६६ खालील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.४ मयत दिनकर काशिनाथ कोळी यांचे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ होणेसाठी दाखल केलेला आहे.

(२) वादी यांचे असे कथन आहे की, वादी क्र.४ दिनकर काशिनाथ कोळी हे दि.३०.१२.२०२३ रोजी मयत झालेले असून त्यांचे वारस याकामी सदरील वादी मयत झालेपासून ९० दिवसांचे मुदतीत रेकॉर्डवर आणणेस विलंब झाला आहे. यातील बहुतांशी वादी हे वयस्कर इसम असून वादींना त्यांचे शेती कामाचे व्यापामुळे वेळेत मे.कोर्टात हजर राहता आले नाही. तसेच एखादा वादी अथवा प्रतिवादी मयत झालेस त्याची वारस पूर्तता कायदयाप्रमाणे मुदतीत करावी लागते या कायदेशीर बाबींची वादींना माहिती नव्हती. अशा परिस्थितीत मयत वादी क्र.४ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी विलंब झालेला आहे तो वादीने जाणूनबूजूण अथवा मुद्दामहून केलेला नाही. वारस रेकॉर्डवर आणणेसाठी झालेला विलंब माफ होऊन मयत वादी क्र.४ यांच्या वारसांची नावे रेकॉर्डवर घेणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

(३) प्रतिवादी यांचे असे म्हणणे आहे की, वादीने जाणूनबूजून विलंब केलेला आहे. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अथवा हेव्ही कॉस्ट करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

(४) प्रस्तुतचा निशाणी क्र.६६ कडील अर्ज, त्यावरील म्हणणे व त्या पुष्ठ्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये वादी क्र.४ दिनकर काशिनाथ कोळी यांचे वारस अभिलेखावर घेणेबाबत झालेला विलंब माफ होवून मिळणेबाबत विनंती केलेली आहे. वादी क्र.४ दिनकर कोळी हे दि.३०.१२.२०२३ रोजी मयत झालेले आहे असे अभिलेखावरील वादी क्र.४ चे

मृत्यूपत्र फे.नि.क्र.७२ अन्वये दिसून येते. सदर वादी क्र.४ मयत झालेबाबत प्रतिवादी यांचा कोणताही आक्षेप दिसून येत नाही. दाव्याचे स्वरुप पाहता वादी यांनी विलंबाने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला केवळ या कारणास्तव अर्ज नामंजूर करणे न्यायोचित होणार नाही. दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता तसेच फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. तरी दाव्याचे स्वरुप विचारात घेता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे;

## **आदेश**

१. वादी यांचा निशाणी क्र.६६ वरील अर्ज वादी यांनी प्रतिवादी यांना रु.२००/– (अक्षरी रुपये दोनशे मात्र) इतका भूर्दंड देणेचे अटीवर मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने मागणीप्रमाणे विहीत मुदतीत दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करुन प्रतिवादी यांना देखील पुरविणेत यावी.

VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE

Digitally signed by VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Date: 2025.12.15 18:16:17 +0530

विटा. (श्रीमती.व्ही.डी.शिरसे)
दिनांकः- ०८.१२.२०२५. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा,
ता.खानापूर, जि.सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | G.U.Varude, |
| Name of the Court | :- | Smt.V. D.Shirse<br>Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 08.12.2025 |
| Order signed by P.O. on | :- | 12.12.2025 |
| Order uploaded on | :- | 15.12.2025 |